अपर पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
सर पोचखानवाला रोड, वरळी, मुंबई–३०
दुरध्वनी क्र.– ०२२–२४९२१२१२, २४९२२६१८
Email - addlcpacbmumbai@mahapolice.gov.in
दिनांक :– ०३/०९/२०२५

**–: प्रेसनोट :–**

| | |
|---|---|
| ला.प्र.वि. | मुंबई विभाग |
| गुन्हा नोंद क्रमांक | २७/२०२५ |
| कलम | कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ |
| अटक आरोपी लोकसेवक | श्री. सचिन बळीराम आत्राम, शिधावाटप निरीक्षक(तपासणी), उप नियंत्रक शिधावाटप यांचे कार्यालय, ग परिमंडळ, कांदिवली पश्चिम, मुंबई |
| लाचेची मागणी | रू. २०,०००/- |
| स्विकारलेली रक्कम | रू. २०,०००/- |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार हे कांदिवली येथील शिधावाटप दुकानामध्ये मॅनेजर म्हणून काम करतात. दिनांक २३/०८/२०२५ रोजी तक्रारदार यांचे दुकानावर शिधावाटपाचे आलेले तांदूळ उतरविण्याकरीता ट्रक आला होता. सदर ट्रक मधून तांदूळ उतरविण्याचे काम चालू असताना लोकसेवक श्री. सचिन आत्राम तेथे आले व त्यांनी ते उपनियंत्रक शिधावाटप कार्यालय, ग परिमंडळ, कांदिवली पश्चिम विभागाचे फिरत्या पथकाचे निरीक्षण अधिकारी असल्याचे सांगून गाडीचा जीपीएस बंद का ठेवला आहे तसेच शिधावाटप निरीक्षक हजर नसताना सामान का उतरविले अशी विचारणा करून तक्रारदार व ट्रक ड्रायव्हर यांचे जबाब नोंदविले. त्यानंतर तक्रारदार यांना " तुमच्यावर गुन्हा दाखल होऊ शकतो असे सांगून गुन्हा दाखल करावयाचा नसल्यास त्यांना व डेप्युटी कंट्रोलर रेशनिंग यांना रू. २०,०००/- दयावे लागतील." असे सांगून लाचेची मागणी केली. परंतू तक्रारदार यांना लोकसेवकांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी दिनांक २५/०८/२०२५ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी, मुंबई येथे समक्ष हजर राहून तक्रार दिली.<br>नमूद तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक ०१/०९/२०२५ रोजी पंचासमक्ष पडताळणी केली असता, लोकसेवक यांनी तक्रारदार यांचेवर गुन्हा दाखल न करण्याकरीता रू. २०,०००/- लाचेची मागणी करून स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार तात्काळ करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक सचिन बळीराम आत्राम यांना तक्रारदार यांचेकडुन लाचेची रक्कम रू. २०,०००/- स्वीकारताना रंगेहाथ पकडण्यात आले आहे. म्हणुन त्यांच्याविरूध्द भ्र.प्र.अधि. १९८८ चे कलम ७ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. |

**तपास अधिकारी :- श्री हरिदास किल्लेदार, सहाय्यक पोलीस आयुक्त** **पर्यवेक्षक अधिकारी :- श्री नितीन थोरात, पोलीस निरीक्षक**

मार्गदर्शन अधिकारी :- श्री. संदीप दिवाण, अपर पोलीस आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
श्री. अनिल तुकाराम घेरडीकर, अपर पोलीस उप आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
श्री. राजेंद्र गणपत सांगळे, अपर पोलीस उप आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

( मनिषा झेंडे )
सहाय्यक पोलीस आयुक्त,(प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग

सहाय्यक पोलीस आयुक्त सत्यमेव जयते बृहन्मुंबई लाचलुचपत प्रतिबंधक विभाग

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई बृहन्मुंबई विभागा तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

संपर्क **:- लाचलुचपत प्रतिबंधकविभाग, बृहन्मुंबई विभाग, ९१, सरपोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई.**
टोलफ्री **क्र. १०६४, दूरध्वनी क्र. ०२२-२४९२१२१२, फॅक्स क्र. ०२२-२४९२२६१८**
व्हॉट्सअप क्र. :– **8828241064** मोबाईल ॲप :– **www.acbmaharashtra.net**
वेबसाईट :– **acbmaharashtra.gov.in, acbwebmail@mahapolice.gov.in**
ईमेल :– **addlcpacbmumbai@mahapolice.gov.in**
फेसबुक :– **www.facebook.com - Maharashtra ACB**